# मल्हारराव

# होळकर



म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
ग्रं. नं. ६९९०

REFBK-0005965

श्री सयाजी बालज्ञानमाला पु॰ ११२ वें

श्रीसयाजी बालज्ञानमाला – पुष्प १६२ वें

# मल्हारराव होळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ५९६५
संग्रह शाखा

के REFBK-0005965 ए.

आवृत्ति १ ली

सन १९४०

प्रती १०००

किंमत ६ आणे

प्रकाशक :

पुरुषोत्तम आत्माराम चित्रे, बी. ए.

खारीबाव, बडोदें.

मुद्रक :

पुरुषोत्तम आत्माराम चित्रे, बी. ए.

आत्माराम प्रेस, खारीबाव, बडोदें.



श्रीमंत युवराज फत्तेसिंहराव गायकवाड

श्री.

या भरतभूमींतील सुविख्यात

**इंदूर**

संस्थानच्या इतिहासप्रसिद्ध

**होळकर**

घराण्याचे आद्यसंस्थापक

**सुभेदार मल्हारराव होळकर**

यांचें हें अल्पचरित्र

**श्रीमंत युवराज फत्तेसिंहराव गायकवाड**

यांस

मनोरंजक वाटून मार्गदर्शक व्हावें म्हणून

अत्यंत राजनिष्ठापूर्वक

अर्पण केलें आहे.

**के. मं. रांगणेकर**

पुस्तककर्ता.

श्री

# विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें विद्याभिलाषी कै. श्रीमंत सरकार महाराजसाहेब सर सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादूर, जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई., एल्एल्. डी., यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजांतून "श्रीसयाजी बालज्ञानमालें"त विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

तदनुसार **मल्हारराव होळकर** या नांवाचा ग्रंथ श्री. **के. मं. रांगणेकर**, बी. ए., यांजकडून तयार करविला, तो उक्त मालेंतून १६३ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषान्तरशाखा,
प्राच्य विद्यामंदिर,
बडोदें

भा. प्र. कोठारी.
भा. मदतनीस

ज्यो. भा. महेता.
विद्याधिकारी,
राज्य बडोदें

२०-१२-४०

# प्रस्तावना

बडोदें येथील 'सहविचारिणी सभे' तर्फे प्रतिवर्षी होणाऱ्या वक्तृत्वोत्तेजक समारंभांपैकीं गतवर्षीच्या म्हणजे सन १९३९ च्या समारंभांत माझा कनिष्ठ पुत्र चि. आनंद उर्फ शांताराम ( वय वर्षे १२ ) यानें भाग घेतला होता. त्यांत त्यास बक्षिसहि मिळालें. त्याच्या भाषणाचा विषय "मी कोण होणार" हा होता. पैसे मिळविण्याच्या निरनिराळ्या चांगल्या अशा धंद्यांपैकीं लेखकाच्या धंद्याविषयीं मीं त्याजकडून त्याच्या भाषणांत पुढील प्रमाणें वदविलें होतें. "आपल्या देशांत लेखकास नुसत्याच लेखनव्यवसायावर पुरेसा पैसा मिळत नाहीं ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. मात्र साइड् बिझिनेस् ( side business-जोडधंदा ) म्हणून लेखनव्यवसाय करणें चांगलें." केवळ या जोडधंद्याच्या हेतूमुळेंच मजकडून (१) इंग्रज लोकांचा संक्षिप्त इतिहास—१९२२, (२) छत्रपति संभाजी महाराज—१९२४, (३) बक्षी बहादर जिवबादादा केरकर—१९३१, व (४) अग्निदिव्य नांवाची भाषांतरित गुजराथी कादंबरी—१९३७, या अल्पकृति लिहिल्या गेल्या. शिवाय "अर्थशास्त्र, भाग १—२" व "मगध देशाचें वैभव" या माझ्या दोन भाषांतरित कृति प्रकाशकाच्या अभावीं अप्रसिद्ध आहेत. त्यानंतर प्रस्तुत पुस्तकहि वर निर्देशिलेल्या

माझ्या हेतूचेंच फळ होय. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मी कांहीं एखादा साधारण देखील साहित्यिक नव्हे. तरीपण श्रीमंत सरकारच्या पसंतीच्या उत्तेजनामुळेंच मजकडून थोडें बहुत लेखन घडूं शकलें, व त्याबद्दल मी श्रीमंत सरकारचा अत्यंत ऋणी आहे. तसेंच त्या उत्तेजनाच्या प्रेरणेमुळेंच मजकडून अप्रत्यक्षरीत्या मातृभाषेची सेवा घडून वाङ्मयसेवाहि घडली, ही गोष्ट माझ्यासारख्या अल्पज्ञास अभिमानास्पद नाहीं असें कोण म्हणेल ?

प्रस्तुत पुस्तक तयार होऊन बराच दिनावधि गेल्यानें पुस्तक लिहिते वेळीं कोणत्या पुस्तकांचा मीं उपयोग केला त्यांचें आज स्मरण नाहीं. तरीपण ज्या ज्या ग्रंथकारांच्या कृतींचा मीं उपयोग केला असेल त्या त्या ग्रंथकारांचें आभार येथें व्यक्त केल्याशिवाय कसें चालेल ?

या पुस्तकाच्या लेखनापासून संपूर्ण प्रकाशनापर्यंत मला माझ्या अनेक स्नेह्यांची व हितचिंतकांची बरीच मदत झाली हें येथें साभार नमूद करणें इष्ट आहे.

**मल्हारराव होळकरांचें** हें अल्पचरित्र वाचून त्यांच्या अंगच्या अनेक गुणांपैकीं एखादा तरी गुण माझ्या बालवाचकांपैकीं प्रत्येक जण घेण्याचा प्रयत्न करील अशी आशा आहे.

काठेवाड दिवाणजीची चाळ, **केशव मंगेश रांगणेकर.**
बडोदें, २०-१२-१९४०

# मल्हारराव होळकर

—१—

मुलांनों, आज मीं तुम्हांस थोर व पराक्रमी पुरुषांपैकीं सुभेदार थोरले मल्हारराव होळकर यांची गोष्ट सांगणार आहें. हें होळकर कोण हें तुम्हांस ऐकून तरी माहित आहेत का ? नसणारच ! परंतु मुसलमानांच्या जाचांतून या आपल्या देशाला ज्यांनीं मुक्त केलें त्यापैकीं मल्हारराव हे एक मुख्य होत असें जर तुम्हांस समजलें तर त्यांची गोष्ट ऐकून घेण्यास तुम्ही उत्सुक व्हाल यांत मला तिळमात्र संशय वाटत नाहीं. तुमची ही उत्सुकता मला अवश्य पुरविलीच पाहिजे. तेव्हां आतां आपण सुरुवातच करूं. ऐका :—

मल्हाररावांचा जन्म इ. स. १६९३ त पुणें जिल्ह्यांत नीरा नदीचे कांठीं जेजुरीजवळ होळ-मुरूम या गांवीं झाला.

मल्हारराव तीन वर्षांचे असतांनाच त्यांचे वडील खंडूजी हे एकाएकीं निवर्तले. त्यामुळें मल्हाररावांच्या मातु:श्रीवर तर

आभाळच कोसळलें. परंतु ती अत्यंत धीराची बायको होती. खंडूजींनीं साधारण शेतीभातीवर आपला संसार चालवून थोडाफार संचय करून ठेविला होता, त्यावरच मल्हाररावांच्या मातुःश्रीनें कांहीं दिवस काढले. परंतु ती बेगमी किती दिवस पुरणार ? अशा स्थितींत भाऊबंदांवर अवलंबून राहिल्यास ते मुलाचे जीवास अपाय करण्यासही कमी करणार नाहींत असें वाटून मल्हाररावांचें मातुःश्रीनें देशांतर करण्याचें ठरविलें. ती आपल्या सुपुत्रासह घर सोडून जी निघाली ती थेट खानदेशांत तळोद्यास आपल्या भावाच्या घरीं आली. तिच्या भावाचें नांव भोजराज. भोजराज घरचे यथातथाच होते. अर्थात् मामास मदत म्हणून मल्हारराव मेंढरें घेऊन रानांत चरावयास जाऊं लागले व मल्हाररावांची आई शेतांत कामधाम करूं लागली.

एके दिवशीं नेहमींप्रमाणें मल्हारराव मेंढरें चरावयास रानांत घेऊन गेले. ते उन्हाळ्याचे दिवस होते व भर दोन-प्रहरची वेळ असल्यामुळें ऊन्ह भयंकर कडक पडलें होतें. मल्हारराव अगदीं थकून गेले होते. त्यामुळें एका वडाच्या झाडाखालीं शिळेवर डोकें टेकून ते जरा लवंडले तोंच त्यांस गाढ निद्रा लागली. इतक्यांत शेजारच्या वारुळांतून एक भला मोठा नाग निघून जणूं काय मल्हाररावांस उन्ह लागूं

नये म्हणून त्यांच्या मस्तकावर फणा उभारून डोलूं लागला. इतक्यांत मल्हाररावांची मातुःश्री मुलाची दुपारची शिदोरी घेऊन तेथें आली. पाहाते तों काय ! मुलाच्या डोक्यावर नाग फणा धरून डोलत आहे. ती तडकच घरीं धांवत गेली व तिनें सर्व प्रकार भावास सांगितला. मल्हाररावाचे मामा बरोबर पांचसहा माणसें घेऊन तेथें येतात तो नाग पूर्ववत् डोलत असून मल्हारराव स्वस्थ झोंपीं गेले होते. या मंडळीनें आल्याबरोबर आरडाओरड केल्यामुळें नाग शांतपणें वारुळांत निघून गेला. मल्हाररावांस त्यानें कांहींच इजा केली नाहीं. मल्हाररावांच्या आईस अत्यंत आश्चर्य वाटून तिनें चार जिव्हाळ्याच्या आप्तेष्टांस त्याचा अर्थ विचारला. तेव्हां एका वृद्धानें या चमत्काराचा अर्थ एका ब्राह्मणास विचारला. तेव्हां तो म्हणाला कीं, ‘ हा मुलगा पृथ्वीपति होईल.’

ही सर्व हकीगत जेव्हां भोजराजास समजली तेव्हां या भविष्याविषयींच त्यांचे विचार सुरू झाले. रात्रंदिवस त्यांस हाच ध्यास लागला. एके दिवशीं त्यांस स्वप्न पडलें. स्वप्नांत जणूं काय जेजुरीस आपल्या कुलस्वामी खंडेरावाच्या दर्शनास गेलों आहों असा त्यांस भास झाला. त्या ठिकाणीं एक सतेज वृद्ध बसला होता. तो म्हणाला, ‘बाबा, परमेश्वरकृपेनें तुझा भाचा

खरोखरच प्रसिद्ध पुरुष होईल.' इतकें तो बोलतो तों चोहोंकडे जयघोष सुरू झाला. ह्या आवाजासरसे भोजराज जागे झाले. ब्राह्मणानें सांगितलेलें भविष्य व स्वप्नदृष्टान्त हीं अगदीं सारखीं जमल्यानें भोजराजास फार आनंद झाला.

त्या दिवसापासून मल्हाररावांस मेंढ्या हांकण्याऐवजीं घरच्या घोड्याची देखरेख करण्याचें काम देण्यांत आलें. हळू-हळू घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें वगैरे मर्दुमकीच्या खेळांत मल्हाररावांस आनंद वाटूं लागला.

नंदुरबारेस सेनापति दाभाडे यांचे एक सरदार बांडे म्हणून होते. त्यांचेकडे मल्हाररावांचे मामा आश्रित म्हणून असत. त्यांचे कांहीं घोडे बांड्यांच्या फौजेंत असत; त्यांतच त्यांनीं भाच्याच्या नांवाचा एक घोडा बांड्यांच्या हवालीं केला. त्यामुळें मल्हारराव हे बांड्यांचे नोकर बनले. पुढें मल्हारराव जेव्हां योग्यतेस चढले तेव्हां त्यांनीं यामुळेंच कृतज्ञतापूर्वक बांड्यांच्या फौजेचा जो पांढरा व तांबडा झेंडा होता तोच पुढें आपल्याही फौजेचा केला.

मल्हाररावांचा शत्रूंच्या फौजेस इतका दरारा असे कीं 'मल्हार आया' असें ऐकतांच सर्वांची गाळण उडे. परंतु हे

सोन्याचे दिवस पाहण्यास बिचारी मल्हाररावांची आई जगली नाहीं.

शाहूमहाराजांनीं बाळाजी विश्वनाथ यांस पेशवे नेमून राज्याचा सर्व कारभार त्यांचेवर सोंपविला होता तेव्हां ते हळूहळू मोंगलांचे मुलखांत स्वाऱ्या करूं लागले. पहिली स्वारी त्यांनीं गोदावरीपर्यंत केली व नंतर मराठे मंडळीची कुमक मिळाल्यावर दुसरी स्वारी त्यांनीं गोदावरीच्या पलीकडे केली. ही स्वारी जेव्हां खानदेश प्रान्तांत येऊन थडकली त्यावेळीं मल्हारराव ऐन ज्वानींत होते. त्यांचे बाहू युद्धासाठीं त्यावेळीं स्फुरण पावत होते. त्यामुळें स्वारीवर जाण्याची परवानगी त्यांनीं मामाकडून मिळविली. अशा तऱ्हेनें मल्हाररावांचा युद्धाचा 'श्रीगणेशा' सुरू झाला.

खानदेशांतून ही स्वारी पुढें दिल्लीपर्यंत गेली. दिल्लीच्या बादशहाचा कारभार त्यावेळीं अगदीं गैदीपणाचा होता. पेशवे दिल्लीजवळ पोंचल्यावर त्यांनीं एका महालकऱ्याशीं खंडणीचा ठराव केला. या ठरावांत एक कलम असें होतें कीं फौजेनें तेथील पिकाची नासाडी करूं नये. परंतु आपल्या घोड्यास वैरण नाहीं असें पाहून मल्हाररावांनीं तेथील पीक कापून आपल्या घोड्यास खाऊं घातलें. या गोष्टीचा बभ्रा होऊन ती

थेट पेशव्यांच्या कानांवर गेली. तेव्हां पेशव्यांचे ज्येष्ठ चिरंजीव बाजीरावसाहेब हे स्वतः चौकशी करण्यास निघाले. सैन्यामधून फिरत असतां मल्हाररावांच्या घोड्यापुढें नुकतेंच कापलेलें पीक त्यांच्या दृष्टीस पडलें. तेव्हां ते भयंकर संतापून त्यांनीं मल्हाररावांच्या एका बारगिरास हातांतील काठी मारली. हा प्रकार मल्हाररावांचे दृष्टीस पडतांच ते रागानें लाल झाले व बाजीरावसाहेब हे पेशव्यांचे चिरंजीव आहेत या गोष्टीची पर्वा न करतां मल्हाररावांनीं पायाखालचें एक ढेंकूळ त्यांच्या आंगावर मारलें व ‘ आम्हांस काय रोजमुरे देऊन भागलांत म्हणून काठ्या मारतां ? ’ असा रोख सवाल त्यांनीं बाजीराव-साहेबांस केला. बाजीरावसाहेब त्यावेळीं मुकाट्यानें आपल्या डेऱ्यांत निघून गेले व वडिलांस सर्व हकीगत सांगून म्हणाले, ‘ परदेशांत जर आपली फौज अशी बेहुकमी वागूं लागली तर पुढें काय अवस्था होईल ? ’ तेव्हां दुसरे दिवशीं मल्हाररावांस लुटावें असा बेत ठरला.

हें वर्तमान एका वीरास समजलें. त्यानें ती बातमी मल्हाररावांस कळविली व वेळ पडल्यास आपण तुम्हांस सामील आहों असाही निरोप पाठविला. परंतु मल्हाररावांचे अलौकिक गुणही पेशव्यांस पटवून देण्यास तो विसरला नाहीं. ‘ जो

तुम्हांस ढेंकूळ मारण्यास चुकला नाहीं तो तुम्हांसाठीं उद्यां शत्रूचा प्राण घेण्यास चुकेल काय ? ' असा एकच सयुक्तिक प्रश्न त्यानें विचारिल्याबरोबर पेशव्यांचा राग शांत झाला; इतकेंच नव्हे तर त्यांनीं मल्हाररावांस २० हजार रुपये देऊन त्यांचा गौरव केला. अशा तऱ्हेनें गुणाची पारख करणें हीच त्यावेळची यशाची गुरुकिल्ली होती.

असो. अशा तऱ्हेनें मिळालेला पैसा चैनींत न उडवितां मल्हाररावांनीं त्याचा विनियोग सैन्यभरती करण्यांत केला.

पेशव्यांची स्वारी दिल्लीहून परतली त्यावेळीं मल्हाररावां-कडे शेंदीडशें स्वार होतेच व शिवाय त्यांनीं सैन्यभरती करण्याचा सपाटाच चालविला होता. अशा तऱ्हेनें सैन्य जमवीत येत असतां ते बाजीरावसाहेब उतरले होते त्या ठिकाणीं येऊन पोंचले. त्यांस पाहतांच पूर्वस्मृति जागृत होऊन मल्हाररावांनीं फौजेसह त्यांस गराडा दिला. तें पाहून बाजीराव-साहेब नुसते हंसले व म्हणाले ‘ दिल्लीच्या स्वारींतील तुझा पराक्रम पाहून मीं तुजवर प्रसन्न झालों आहें. तरी मनांतील संशय सोडून मीं तुझ्याशीं स्नेहभावानें वागेन अशी तुला शपथ देतों. एवढेंच नव्हे तर मला पेशवाई मिळतांच मी तुला पांच हजार स्वारांची सरदारी देईन.’ हें त्यांचें प्रेमळ व उल्हासकारक

भाषण ऐकून मल्हाररावांचा राग शांत झाला. त्यांनीं लगेच स्वारांचा वेढा उठविला व बाजीरावसाहेबांस मित्रत्वानें वागण्याचें वचन दिलें. नंतर मल्हारराव तळोद्यास आले व त्यांनीं आपल्या-बरोबर आणलेला सर्व पैसा मामांचे स्वाधीन केला. असो. यावेळीं भोजराजाची मुलगी गौतमाबाई उपवर झाली होती. भाच्याचा पराक्रम पाहून मल्हाररावांस आपला जांवई करण्याचें भोजराजांनीं ठरविलें व त्याप्रमाणें आपल्या कन्येस वीरपत्नी बनविलें.

लवकरच मल्हाररावांच्या पदरीं असलेल्या फौजेच्या निर्वाहाची पंचाईत पडूं लागली; त्यामुळें मामाच्या सल्ल्यानें मल्हारराव वढवणीस जाऊन राहिले.

पुढें कांहीं काळानें पेशव्यांच्या सैन्यानें वढवणीस वेढा दिला. मल्हारराव तेथें होतेच, त्यांनीं तेथील रांगड्यास मदत करण्याचें अभिवचन दिलें व तीन महिनेपर्यंत त्या सैन्याची रग जिरविली. ही बातमी पेशव्यांस कळतांच त्यांनीं मल्हाररावांस निरोप पाठविला कीं, 'उभयपक्षीं मुखत्यारी तुमचीच आहे.' हे गौरवाचे शब्द ऐकून व पूर्वीं बाजीरावसाहेबांस दिलेल्या वचनाची आठवण होऊन मल्हाररावांनीं मोठ्या शिताफीनें पेशव्यांचें वर्चस्व तेथें स्थापन केलें. एवढेंच नव्हे तर खंडणी

व शिवाय स्वारीखर्च घेऊन तो पेशव्यांकडे रवाना केला.

यामुळें तर पेशवे मल्हाररावांवर अत्यंत खूष झाले व असा मोहरा आपल्या पदरीं अवश्य असावा असा विचार करून पेशव्यांनीं तळोद्यास भोजराजाची या विचारास संमती मिळविण्यासाठीं एक कारकून पाठवून दिला. भोजराज प्रथम कबूलच होईनात. परंतु मल्हाररावांच्या भावी कल्याणावर नजर देऊन त्यांनीं त्यांस पेशव्यांकडे जाण्याची परवानगी दिली.

पुढें बाळाजी विश्वनाथ हे मरण पावले व बाजीराव-साहेबांस पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं.

त्यानंतर बाजीरावसाहेबांनीं माळव्यांत तीन स्वाऱ्या केल्या. प्रत्येक स्वारींत मल्हारराव बाजीरावांबरोबरच आघाडीस असत. या त्यांच्या गुणाचें बक्षिस म्हणून व मागील वचन आठवून त्यांनीं मल्हाररावांस शाहूमहाराजांकडून चौथाई व सरदेशमुखीचे हक्क वंशपरंपरा देवविले.

पेशव्यांचें वैभव दिवसेंदिवस वाढत चाललें. त्यामुळें सेनापति दाभाडे, उदाजी पवार वगैरे सरदार पेशव्यांचा द्वेष करूं लागले. उदाजी पवारांचा उद्धटपणा तर इतका वाढला कीं ते स्वतःच्या मर्जीप्रमाणें माळव्याची व्यवस्था पाहूं लागले. अशा तऱ्हेनें पेशव्यांचा हुकूम माळव्यांत चालेना. तेव्हां त्यांनीं मल्हाररावांस फौज वाढवून माळव्याची वसुलात करण्याचा अधिकार दिला.

पुढें पेशव्यांचा विचार ठरला कीं, माळव्यांत मोंगलांचा सुभेदार दायबहादुर आहे त्याजवर स्वारी करावी. परंतु प्रथम उदाजी पवाराविषयीं गोष्ट निघाली. तेव्हां उगीच द्वैत वाढवूं नये असा मल्हाररावांनीं पेशव्यांस सल्ला दिल्यामुळें दोघांनींही पवारांची भेट घेतली व पवारांनीं पेशव्यांच्या नोकरींत राहावें असा त्यांस सवाल टाकला. परंतु पवार पेशव्यांची नोकरी करण्याचें कबूल करीनात, कारण ते शाहूमहाराजांचे स्वतंत्र नोकर होते. परंतु ते प्राप्तीचा अर्धा हिस्सा मिळत असल्यास स्वारीवर येण्यास तयार झाले. पेशव्यांनीं त्यांची समजूत

घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु पवार आपला हेका सोडीनात. त्यांना आपल्या मर्दुमकीची फार घमेंड. तेव्हां मल्हाररावांस अतिशय त्वेष येऊन ते बोलले कीं, 'इतकी विनवणी केली तरी ऐकत नाहींत, मर्जी त्यांची; एक कुळंबट न आलें तर आपलें काय नडणार आहे ?' असें बोलून त्यांनीं पेशव्यांस उठविलें.

इकडे पवारांचे दिवाण रामराव कवठेकर यांनीं पवारांस पुष्कळ बुद्धिवाद सांगितला. त्यांनीं एवढेंही सांगितलें कीं, 'मल्हारराव हे केवळ परीस आहेत. ते पेशव्यांबरोबर असल्यानें आपण न गेल्यास पेशव्यांचें कांहींच अडणार नाहीं,' हें बोलणें पवारांस रुचलें व पेशव्यांच्या मागोमाग जाऊन त्यांस मिळावें अशी मसलत ठरली. इकडे जयपूरवाले, जोधपूरवाले वगैरे हिंदु राजेरजवाड्यांस प्रत्येक तीन वर्षांनें जिझिया नांवाचा कर दिल्लीच्या बादशहास द्यावा लागत असे. त्यामुळें हे राजे अतिशय त्रासून गेले होते. तेव्हां त्यांनीं दक्षिणेंतील लढवय्ये मराठे लोक यांस साथीदार घेऊन त्यांच्याद्वारें बादशाही मुलखांत लुटालूट करावी असें ठरविलें. मल्हारराव होळकर त्यावेळीं नर्मदेच्या कांठीं होते. त्यांस जयपूरकरांनीं असा निरोप पाठविला कीं, 'तुम्ही उज्जनीस असलेला मोंगलांचा सुभेदार दायबहादूर

याजवर हल्ला करून त्यास हांकून लाविल्यास इकडील सर्व राजे आपणांस सामील होतील.' मल्हाररावांसही दायबहादुराचा समाचार घ्यावयाचा होताच. परंतु त्यांस नर्मदेच्या उताराची माहिती नव्हती. तेव्हां त्यांनी जयपूरकरांच्या साह्यानें नर्मदा उतरण्याचें ठरविलें.

इकडे दायबहादुरास मराठ्यांची फौज आल्याची बातमी कळतांच त्यानें घाटनाक्याचा बंदोबस्त केला, परंतु मल्हारराव दुसऱ्याच वाटेनें नर्मदा उतरून घाट चढून वर आले, व दायबहादुरानें केलेला बंदोबस्त जागचे जागींच राहिला. ही बातमी उदाजी पवारास समजतांच ते पूर्व संकेतानुरूप नर्मदा उतरून मल्हाररावास येऊन मिळाले. मल्हारराव पूर्वी उदाजीनें आपला अपमान केला होता ही गोष्ट विसरून त्यास मोकळ्या-मनानें भेटले. याचेंच नांव मनाचा थोरपणा !

बादशाही फौज मूळचीच चैनी ! तशांत मल्हाररावांनीं एकदम चाल केल्यामुळें शत्रूंचा तोफखाना त्यांस सहज हस्तगत करतां आला व पायदळ तर त्यांनीं सारखें कापून काढलें.

इतक्यांत दायबहादुर अवसान धरून युद्धास उभा राहिला.

परंतु मराठ्यांनीं आवेशानें हल्ला करून दायबहादुरास हत्तीवरच्या हत्तीवरच ठार केलें. अशा तऱ्हेनें जी स्वारी करण्यास कोणाचाच धीर झाला नाहीं ती मल्हाररावांनीं एका छाप्यांत जिंकून दाखविली. पुढें मल्हारराव कूच करून धारला गेले; आणि तेथें त्यांनीं पेशव्यांच्या नांवाची द्वाही फिरविली.

याप्रमाणें माळवा प्रांतीं मराठ्यांचा अंमल सुरू झाला. पुढें मल्हाररावांनीं इंदूर शहर स्वतःसाठीं मागून घेतलें व तें अद्यापिही होळकरांकडेच चालू आहे.

पुण्यास आल्यानंतर मल्हाररावांनीं आपणांस पागा जरीपटका वगैरे मान मिळावा असें पेशव्यांकडे मागणें केलें; व राणोजी शिंदे यांस पागे नेमून द्यावें असेंही सुचविलें. तेव्हांपासून शिंदे होळकरांची सांगड जुळली. पुढें शिंदे होळकर माळवा प्रांतीं आले व माळवा प्रान्तांची वांटणी पेशवे, होळकर, शिंदे व पवार यांत करून देण्यांत आली.

नंतर पेशव्यांनीं दिल्ली शहर लुटण्याचा घाट घातला. पेशव्यांची स्वारी दिल्लीपासून सात आठ कोसांवर येऊन ठेपली, त्यावेळीं जवळच कालिकादेवीच्या मेळ्यांत मुसलमानांच्या हातून होणाऱ्या गोवधाची बातमी मल्हाररावांस समजली; तेव्हां त्यांस

अत्यंत त्वेष येऊन त्यांनीं अशी प्रतिज्ञा केली कीं बादशहाचा आजा कीं निपणजा कोणी हुमायून म्हणून होऊन गेला, त्याची येथें जवळच कबर आहे; तिजवर एक रानडुकर मारून मीं आपल्या हातानें टांगीन तरच पुन्हा हातांत शस्त्र धरीन !

पुढें मल्हारराव व इतर सरदारांनीं बायका, मुलें व अशस्त्र लोक शिवाय करून जेवढे म्हणून मुसलमानांच्या पक्षाचे सांपडतील तेवढ्यांची, एकदम हल्ला करून कत्तल सुरू केली. नंतर तुकोजी होळकरांनीं शिकार करून आणलेला डुकर कबरीवर सर्वांस दिसेल असा मल्हाररावांनीं स्वतःच्या हातांनें टांगून आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. पुढें पेशव्यांनीं दिल्लीवर स्वारी केली व बादशहास जेरीस आणून त्यास तह करण्यास भाग पाडलें. या स्वारींत पेशव्यांस माळवा प्रांताचें आधिपत्य मिळालें.

---

हळूहळू दिल्लीचे बादशहास मराठ्यांचें प्राबल्य फार वाढलें आहे असें वाटूं लागलें; व असाच जर क्रम चालला तर मुसलमानी राज्य लवकरच रसातळास जाईल अशीही त्यास साधार भीति वाटूं लागली. तेव्हां निजाम-उल्-मुल्क वगैरे सारख्या प्रमुख लोकांच्या सल्ल्यानें त्यानें मराठ्यांशीं युद्ध करण्याचें ठरविलें. मराठ्यांचीही तयारी होतीच. त्यांनीं वेगवेगळ्या युक्त्या योजून निजामास कैचींत धरलें व मराठे जें जें मागतील तें तें देण्यास त्यास भाग पाडलें. या स्वारींत मल्हारराव होळकरच मुख्य होते. ह्यावेळीं म्हणजे इ. स. १७३८ त वसई वगैरे मुलुख पोर्तुगीज लोकांकडे होता. यांस फिरंगी म्हणत असत. प्रथम हे फिरंगी लोक व्यापारी म्हणून हिंदुस्थानांत आले परंतु पुढें त्यांस राज्यलालसा उत्पन्न झाल्यामुळें त्यांनीं तराजू टाकून शस्त्र हातीं घेतलें. ह्यांचा पहिला गव्हरनर जनरल अलफान्सो अलबुकर्क यानें गोंवें ही राजधानी केली. पुढें पोर्तुगीज लोकांची सत्ता वाढत गेली. त्यांनीं आपल्या धर्माचेंही बंड माजविलें. आपला धर्म पसरविणें हेंच आपल्या धर्माचें मुख्य तत्त्व असें

ते मानूं लागले. बंदीत टाकणें, उपाशी मारणें, चाप लावणें, तापलेल्या तव्यावर उभें करणें वगैरे सारख्या दुष्ट व अमानुष उपायानीं लोकांस बाटविणें हाच आपला धर्म असें ते मानीत.

अशा तऱ्हेनें फिरंगी लोकांनीं वसई वगैरे प्रांतांतील लोक जुलमानें बाटविण्याचा सपाटा सुरु केला. घरांत कोणी न सांपडलें तर लहान मुलें धरून बाटवावीं; एखाद्या गांवीं सुपारी-एवढ्या दगडास शेंदूर लावून देव बनविलेला दृष्टी पडला कीं, सबंध गांवचा गांव धरून बाटवावा; हिंदूंचीं देवळें जमीनदोस्त करावीं. एके वेळीं तर त्यानीं साष्टी, आगर, वसई व वांद्रें हीं गावें वेढून तेथील सर्व लोक जुलमानें बाटविले ! याप्रमाणें कहर उडाल्यानें कित्येक लोक त्यावेळीं महाराष्ट्रांत छत्रपतींचा विजयध्वज फडकत होता, त्यांच्या आश्रयास गेले व पुष्कळांनीं समुद्रांत उड्या टाकून प्राण दिले. ज्यावेळीं बाजीरावसाहेबांस ही बातमी कळली त्यावेळीं त्यांस अतिशय त्वेष आला; व फिरंग्यांची एकदां खोड मोडावी असा त्यांनीं बेत केला, व त्याप्रमाणें मल्हाररावांस पुढें ठाण्यास जाण्याची आज्ञा केली. ही बातमी फिरंग्यांस कळतांच तिकडून पेद्रो द मेल हा तयारी करून आला व त्यानें गरनाळांचा मारा सुरू केला. परंतु थोडक्याच वेळांत मल्हाररावांच्या एका गोलंदाजानें नेमकी

बुरजाच्या वरच्या बाजूस तोफ डागून पेद्रो द मेलला ठार केलें ! त्यामुळें इतर फिरंगी वसईकडे पळून गेले, व मल्हाररावांस जय प्राप्त झाला.

इकडे पेशव्यांचे भाऊ चिमाजी आप्पा यांनीं माहीम सर केलें व वसईस मोर्चे लाविले. परंतु तीन महिने शिकस्त करूनही किल्ला सर होईना. तेव्हां आप्पासाहेब सर्व सरदारांस म्हणाले कीं, "किल्ला पहावा अशी माझी फार इच्छा आहे; पण तो तर हस्तगत होत नाहीं; तर आतां मला तोफेच्या तोंडीं बांधून तोफ उडवा म्हणजे मेल्यावर तरी माझा देह किल्ल्यांत पडेल !" याप्रमाणें आप्पासाहेबांचे निर्वाणीचे शब्द ऐकून सर्वांनीं 'किल्ला सर केल्याशिवाय पुण्यास तोंड दाखविणार नाहीं' अशी शपथ घेतली.

नंतर किल्ल्याची माहिती घेण्यासाठीं खंडोजी माणकर हे गुराख्याचा वेष घेऊन किल्ल्यांत गेले व त्यांनीं ठिकठिकाणीं सुरुंग लावले. परंतु सर्व सुरुंग फुकट गेले.

तथापि एक सुरुंग उडावयाचा तसाच राहिला होता हें मल्हाररावांच्या लक्षांत येतांच त्यांनीं तें काम स्वतःच्या शिरावर घेतलें व तो इतक्या शिताफीनें उडविला कीं, त्यासरसा

किल्ल्याचा अर्धाअधिक बुरूज धाडकन् कोसळला. तेव्हां मराठ्यांचें सर्व सैन्य 'हरहर महादेव' असा सिंहनाद करून आंत घुसलें. शेवटीं तह करून फिरंगी लोक आपलें सर्व खटलें जहाजांत भरून निघून गेले व किल्ला मराठ्यांस मिळाला. आप्पासाहेबांचा त्यावेळचा आनंद काय वर्णावा ? किल्ल्यावर लगेच मराठ्यांचें भगवें निशाण फडकूं लागलें.

या धुमश्चक्रींत एक विलक्षण गोष्ट घडली. किल्ल्यांतील एका फिरंगी सरदाराची बायको गुप्तपणें मचव्यांतून गोंव्यास जाण्यास निघाली होती. मराठ्यांनीं त्या बाईस अचानक पकडून आप्पासाहेबांपुढें उभी केली. ती बाई अत्यंत देखणी होती, तरी त्यांनीं तिला बहिणीप्रमाणें मानून साडीचोळी देऊन मोठ्या सन्मानानें गोंव्यास पोंचती केली.

मराठ्यांच्या यशाची गुरुकिल्ली म्हणजेच अशातऱ्हेची परस्त्रीविषयीं निष्पापबुद्धि होय असें कोण म्हणणार नाहीं ?

तारीख २८ एप्रिल १७४० रोजीं श्रीमंत बाजीराव-साहेबांचा अंत झाला. बाजीरावसाहेबांनीं आजपर्यंत स्वराज्या-साठीं केलेले श्रम छत्रपतींनीं लक्षांत घेऊन इतर अडथळ्यांस न जुमानतां बाजीरावांचे चिरंजीव नानासाहेब यांसच पेशवाईचीं

वस्त्रें दिलीं. नानासाहेबांस अधिकार मिळतांच त्यांनीं दिल्लीच्या बादशहाशीं एक नऊ कलमांचा तहनामा केला; व या तहनाम्या-प्रमाणें पेशवे वागतील अशा जामिनकीवर ज्या मराठे सर-दारांच्या सह्या घेण्यांत आल्या त्यांत मल्हारराव हे मुख्य होते. यावरून मल्हाररावांची योग्यता बादशहाच्या दरबारीं पेशव्यां-इतकीच होती असें सिद्ध होतें.

मुलांनों, आतां मीं तुम्हांस थोडीशी दक्षिणेकडील हकीगत सांगतों. छत्रपति राजाराम महाराजांची बायको ताराबाई ही विलक्षण कारस्थानी स्त्री होती. तिला राज्यकारभारांत ब्राह्मणांचें वर्चस्व मुळींच खपत नसे. त्यामुळें ती पेशव्यांच्या विरुद्ध होती. तिच्या मनांतून नानासाहेबांस पेशवाईपदावरून काढून निजामअल्लीचा दिवाण रामदासपंत याच्या पुतण्यास पेशवाई द्यावी असें होतें. हें रामदासपंतांस कळतांच त्यानें खूप सैन्यानिशीं नानासाहेबांवर हल्ला केला परंतु त्यांत रामदास पंतांस अपयश आलें. नंतर नानासाहेबांनीं ही हकीगत मल्हाररावांस कळवून त्यांस माळव्यांतून बोलावून घेतलें.

माळव्याची व्यवस्था मल्हारराव पाहात असत हें तुम्हांस मागें सांगितलेंच, परंतु आतां नानासाहेबांनीं त्यांस 'माळव्याचे सुभेदार' नेमून त्यांचा गौरव केला.

पुढें रघुनाथरावदादा, मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे जाटाच्या मुलखांत आले व त्यांनीं सुरजमल्ल जाटावर स्वारी

सं. ग्रं.

केली. सुरजमल्ल फौजबंद होता. त्यामुळें दीडमहिना झाला तरी जाटांचा कुंभेरीचा किल्ला सर होईना.

याप्रमाणें युद्ध सुरू असतां मल्हाररावांचे एकुलते एक चिरंजीव खंडेराव हे जेवण करून बाहेर उभे असतां त्यांच्यावर एक गोळा येऊन पडला, व ते जागच्याजागींच ठार झाले. हें ऐकून मल्हाररावांवर आकाशाच कोसळलें. ही हृदयविदारक बातमी खंडेरावांच्या आईस व पतिव्रता पत्नी अहिल्याबाईस कळतांच केवढा हलकल्लोळ झाला हें तुम्हांस सांगून समजणार नाहीं. थोड्या वेळानंतर अहिल्याबाई आपला शोक आवरून पतीच्या शवापाशीं आल्या व पतिमुख पाहून सती जाण्यास आपल्या सासूसासऱ्याची परवानगी मागूं लागल्या. तेव्हां तर मल्हाररावांस धरणी दुभंग होऊन आपणांस पोटांत घेईल तर बरें असें वाटूं लागलें. ज्या मल्हारचें नांव ऐकतांच शत्रू गर्भगळीत होत तेच मल्हारराव एकाद्या अर्भकासारखे टाहो फोडीत होते. ते अहिल्याबाईस म्हणाले, 'बाळे अहिल्ये, तूंही आतां सती जाऊन आम्हांस चोहींकडून उघडी करतेस काय? तूं असल्यास आम्हीं अहिल्या गेली व खंडू आहे असेंच समजून मनास धीर देऊं!' हे निर्वाणीचे शब्द ऐकून अहिल्याबाईनें सती जाण्याचा आपला हेका सोडला. मुलांनो,

ह्या अहिल्याबाई कोण ठाऊक आहे ना तुम्हांला ? ज्या अखिल महिलासमाजास आदर्शभूत वाटतात व ज्यांची पुण्यतिथि महाराष्ट्रांत अद्यापही साजरी करण्यांत येते त्या अहिल्याबाई होळकर त्या याच होत.

आपल्या एकुलत्या एक पुत्राच्या मरणास सुरजमल्ल जाट हाच कारण झाला असें पाहून मल्हाररावांस अत्यंत खेद आला व त्यांनीं स्मशानांतच अशी भीष्मप्रतिज्ञा केली कीं, "सुरजमल्लाचा शिरच्छेद करून कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरच खरा मल्हारराव. नाहींतर प्राणत्याग करीन." ही बातमी सुरजमल्लास समजली तेव्हां त्याच्या काळजानें ठाव सोडला. मल्हाररावांची प्रतिज्ञा म्हणजे अलबत्यागलबत्याची प्रतिज्ञा नव्हे हें त्यास पक्कें ठाऊक होतें. तेव्हां आपला बचाव कसा करावा या विषयीं त्यानें आपल्या पत्नीचा विचार घेतला. तिनें सांगितलें कीं, मल्हाररावाबरोबरचे सरदार जयाजी शिंदे मात्र आहेत तेव्हां त्यांस वश करून घ्यावें. तेव्हां सुरजमल्ल जयाजीस शरण गेला व त्यांची त्यानें रक्षणाकरतां याचना केली. मराठ्यांचा धर्म असा कीं, 'शरण आलेल्याचें मरण कधीं चिंतूं नये.' अर्थात् जयाजी शिंद्यांनीं सुरजमल्लास अभयवचन दिलें. ही बातमी मल्हाररावांस कळतांच त्यांस भयंकर खेद आला.

त्यांनीं ही बातमी लगेच पेशव्यांच्या कानावर घातली. परंतु पेशव्यांचे बंधु दादासाहेब यांस जयाजीकडून अशी गोष्ट घडेल हें शक्य वाटेना. कदाचित् मल्हाररावांची सूडाची भावना पूर्ण होत नसल्यानें ते जयाजीवर हा आळ घेत असावे असेंच त्यांस वाटलें. परंतु सुरजमल्लावर मात्र हल्ले चालूच होते. तेव्हां तो अगदीं जिकीरीस येऊन त्यानें जयाजींस सल्ला करण्याविषयीं निकड लावली. तेव्हां जयाजींनीं दादासाहेबांस सल्ला करण्याची गळ घातली. परंतु सल्ला करावा तर मल्हाररावांची मर्जी जाते व न करावा तर किल्ला अजून सर होत नव्हता. दादासाहेब जेव्हां आपल्या हेतूप्रमाणें जाटाशीं तह करीनात असें जयाजींनीं पाहिलें तेव्हां त्यांनीं निराळाच उपाय योजिला. 'आम्हांस मारवाडहून रामसिंगाकडून मदतीस येण्याविषयीं बोलावणें आलें आहे' असें सांगून त्यांनीं तेथून पाय काढण्याचा उपाय योजिला. वास्तवीक अशा आणीबाणीच्या वेळीं सुरजमल्लास एकटा सोडून वचनभंग करण्यांत जयाजींनीं चूकच केली. त्यांनीं मल्हाररावांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे होता, व तें साध्य झालें असतें; कारण मल्हारराव दुरभिमानी व हट्टास पेटणारे नव्हते.

असो. शिंदे निघून गेल्यावर दादासाहेबांनीं मल्हाररावांस

बोलावून ती बातमी सांगितली व म्हटलें 'जाटास दिल्लीहूनही मदत येते आहे असें ऐकतों; तरी आतां काय करावें तें आपणच सुचवावें!' मल्हारराव मनांत समजले कीं, हें सर्व दादासाहेबांच्या विचारानेंच होत आहे. परंतु ते उघड बोलले नाहींत. ते म्हणाले, 'आम्हांस काय ? आपली जशी आज्ञा होईल तसें आम्ही वागूं.' हे ऐकतांच दादासाहेबांनीं मल्हाररावांस मथुरेस कूच करण्याची आज्ञा दिली. अशा तऱ्हेनें जाटाचा सूड उगविण्याची मल्हाररावांची प्रतिज्ञा पूर्ण झाली नाहीं.

सुभेदार मल्हारराव मथुरेस आले त्यावेळीं जाटाच्या मदतीस जाणारी बादशाही फौज जवळच आहे असें त्यांस समजलें. तेव्हां त्यानीं त्या सैन्यावर अचानक छापा घातला. 'मल्हार आया' अशी ओरड ऐकतांच फौज माघारी पळत सुटली. मल्हाररावांच्या सैन्यांत त्यावेळीं पेंढारी लोक जास्त होते. त्यांनीं लुटालूट सुरू केली व खुद्द शहाजादीसही लुटलें. ही बातमी सुभेदारांस कळतांच ते जातीनिशीं तेथें आले व त्यांनीं शहाजादीस सोडवून तिची बरदास्त राखण्याबद्दल हुकूम सोडले. यावेळच्या लुटींत सुभेदारांस एक रथ व एक हिरेजडित फणी मिळाली. रथाच्या पडद्यांस अस्सल मोत्यांची जाळी होती व फणीची किंमत एक लाख रुपयांहून जास्त होती. या दोन्ही

वस्तु साध्वी अहिल्याबाईच्या मरणापर्यंत जपून ठेवण्यांत आल्या होत्या. या लुटीपैकीं पेशव्यांचा एक व शिंद्यांचा एक असे दोन भाग मल्हाररावांनीं पोंचते केले. यावरून मल्हारराव आपापसांतील एकीबद्दल किती दक्ष होते हें दिसून येतें.

---

पुढें दादासाहेबांस व सुभेदार मल्हाररावांस जेव्हां अब-दल्लीनें खुद्द दिल्लीची व आसपासच्या पुण्यक्षेत्राची केलेली दुर्दशा समजली तेव्हां त्यांस अत्यंत त्वेष आला. ते दोघेही त्या जोरांतच मोहिमेवर निघाले व कूच दरकूच करीत कुरुक्षेत्रीं जाऊन पोंचले व पुढें मार्गांत अतिशय लूट मिळवीत ते थेट अटकेस जाऊन पोंचले. अशा तऱ्हेनें या उभयतां मराठे वीरांनीं श्रीछत्रपतींचा 'भगवा झेंडा' अटकेवर—हिंदुस्थानच्या वायव्य सीमांतावर फडकाविला. 'अटकेस झेंडा लावला' म्हणतात तो हाच. या स्वारींत मराठ्यांच्या पराक्रमाचा पूर्ण कळस झाला.

मल्हारराव व राघोबादादा यांचा अटकेवर एक महिनाभर मुक्काम झाल्यावर त्यांनीं आपला मोर्चा दाक्षिणेकडे वळविला. वाटेंत त्यांस दत्ताजी व जनकोजी शिंदे भेटले. ते दादासाहेबांस म्हणाले, 'दादासाहेब, आपण सर्व हिंदुस्थानावर स्वारी करून अटकेस झेंडे लावले; आतां आम्हीं कोणत्या प्रांतावर स्वारी करावी ?' तेव्हां त्यांनीं त्यास नजीबखानावर स्वारी करण्याची सल्ला दिली. ते म्हणाले, 'अटकेपासून रामेश्वरापर्यंत एकछत्री

राज्य झालें, एक नजीबखान मात्र राहिला आहे.'

नजीबखान रोहिला हा एक दगलबाज, निमकहराम माणूस होता. त्यानें दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यांस अभयवचन देऊन व नंतर दगा करून मारण्याचा बेत केला. हें दत्ताजींस समजतांच त्यांनीं लागलीच मल्हाररावांस येऊन भेटण्याचें अगत्याचें पत्र लिहिलें. परंतु मल्हारराव येण्यापूर्वींच नजीबखानानें गर्दी करून शिंद्यांवर चाल केली. या चकमकींत जनकोजींच्या हातास गोळी लागली व दत्ताजींचा शिरच्छेद झाला.

मल्हारराव इकडे दत्ताजींच्या पत्राप्रमाणें दौड करीत येत होते. तोंच त्यांस वाटेंत शिंद्यांची झालेली दुर्दशा समजली. ती हकीगत ऐकून मल्हाररावांनीं एकदम जमिनीवर अंग टाकलें. प्रत्यक्ष स्वतःचे चिरंजीव खंडेराव होळकर पडले त्या वेळेससुद्धां मल्हाररावांनीं एवढा शोक केला नव्हता. उलट, त्यांचे चिरंजीव वारल्यापासून त्यांचें प्रेम दत्ताजी व जनकोजी या उभयतांवर फारच जडलें होतें. असो. दुसरेच दिवशीं सुरजमल्ल जाटाकडून निरोप आला कीं, 'गिलच्यांची फौज तुम्हावर चालून येत आहे.' अर्थात् प्रसंग आणीबाणीचा होता. बायकामुलें बरोबर व तशांत जनकोजी जखमी. तेव्हां जनकोजीनें बायकामुलें घेऊन जावें असें मल्हाररावांचें मत

पडले; परंतु जनकोजी ऐकेनात. तेव्हां बायकामुलें माळव्यांत पाठवून दोघांनीं गनिमीकाव्यानें लढून गिलच्यांचा समाचार घेण्याचें ठरलें.

परंतु मराठ्यांची फौज फारच थोडी होती. गिलच्यांनीं अचानक हल्ला केल्यामुळें तिचा धीर खचून ती पळूं लागली, कारण गिलच्यांच्या स्वभावाप्रमाणें ते एकदम कत्तल करीत सुटले. परंतु त्यांच्यांतही कांहीं उमद्या स्वभावाचे लोक होते. मराठे व गिलचे यांच्या या चकमकींत शेटीबा खराडे नांवाच्या मराठ्यावर एका गिलच्यानें कृपा केली ती गोष्ट अशी:—

शेटीबा मरणोन्मुख होऊन पडले असतां त्यांचा मुलगा शिवाजी त्यांस मांडी देऊन बसला होता. इतक्यांत तेथें एक पठाण आला. त्यांस शेटीबा दीन मुद्रेनें म्हणाले, " बाबा, हा माझा मुलगा एवढें एकच माझें संतान. तेव्हां तूं जर त्यास सुखरूपपणें मराठ्यांच्या फौजेंत नेऊन पोंचवशील तर माझ्या अंतकाळच्या आशीर्वादानें देव तुझें कल्याणच करील !" त्या पठाणानें शेटीबांस आश्वासन दिल्यावरच शेटीबांचें प्राणोत्क्रमण झालें. पुढें त्या पठाणानें कबूल केल्याप्रमाणें शिवाजीस मराठ्यांच्या फौजेंत नेऊन पोंचविलें. शाबास त्याची! शत्रु असून मनाचा मोठा खरा !

मराठ्यांच्या पळाची हकीगत जनकोजीकडून जेव्हां श्रीमंत नानासाहेबांस समजली तेव्हां ते फार दिलगीर झाले. परंतु आतां लढाईवर कोणी जावें हा प्रश्न उपस्थित झाला. पेशव्यांचे चुलतबंधु भाऊसाहेब यांनीं नुकतीच उदगीरच्या लढाईत यशःश्री संपादन केल्यामुळें ते फुगून गेले होते. तेव्हां आपण जाणार म्हणून ते हट्ट धरून बसले. त्यांचें मन वळविण्याचा पुष्कळांनीं प्रयत्न करून पाहिला, परंतु व्यर्थ. पेशव्यांच्या पत्नी गोपिकाबाई यांनींही त्यांस पदर पसरून न जाण्याविषयीं विनंति केली; परंतु भाऊसाहेबांनीं कोणाचेंही न ऐकतां जाण्याचाच निश्चय कायम केला.

नंतर भाऊसाहेब बरोबर वीस हजार घोडेस्वार घेऊन मजल दरमजल करीत निघाले व त्यांनीं मल्हाररावांस 'आम्ही एकदम कूच करून यावें कीं दम खात यावें' असें पत्र पाठवून सल्ला विचारला. पत्रांतील मजकूर वाचून मल्हाररावांस अत्यंत खेद झाला. 'भाऊसाहेब मुख्य कर्ते पुरुष. त्यांनीं फक्त आम्हांस फौजेची कुमक पाठविली पाहिजे होती. तें न करतां ते स्वतःच निघून आले. आतां काय म्हणावें ?' असे दुःखोद्गार त्यांनीं काढिले. त्यांनीं लगेच भाऊसाहेबांस उत्तर पाठविलें कीं, 'आपण येण्याची उगीच तसदी घेतलीत. तरी आतां

आपण येथवर येऊन गुंतून पडण्यांत अर्थ नाहीं; आपण माळवा प्रांतीं राहून पुढें फौजा मात्र पाठवाव्या !'

परंतु पेशव्यांचे सरदार बळवंतराव मेहेंदळे यांनीं भाऊसाहेबांस उलट चिथविलें. 'शिंदे होळकर स्वतःसच सर्व मोठेपणा घेऊं पहातात; त्यांस आपण आलेले पहावत नाहीं' असा बदसल्ला त्यांनीं भाऊसाहेबांस दिला. तेव्हां भाऊसाहेब तसेच पुढें निघाले व त्यांनीं मल्हाररावांस तसें पत्रानें कळविलें. तेव्हां मल्हाररावांच्या लक्षांत सर्व गोष्टी आल्या. त्यांनीं भाऊसाहेबांस उलट सणसणीत उत्तर पाठविलें. 'आम्ही आतां वृद्ध झालों, तेव्हां आमची अक्कल मंद झाली व आपल्याभोंवतीं जमलेली नवी मंडळी तेवढी शहाणी असेंच सरकारचें मत झालेलें दिसतें. तथापि आपण मालक आहां. आमचें कर्तव्य म्हणून आतां एवढीच एक विनंति करावयाची कीं आपण आतां तरी आणखी पुढें न येतां फक्त फौज रवाना करावी.'

यावर बळवंतराव मेहेंदळ्यांनीं पूर्वीप्रमाणेंच बदसल्ला दिला. ते म्हणाले कीं, 'आपण इकडे मुळींसुद्धां लक्ष न देतां कूच करून एकदम दिल्लीस जावें हेंच उत्तम !'

यावेळीं विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांनींही असा सल्ला दिला कीं, ' पुष्कळ सरदारांनीं आपलीं बायकामुलें बरोबर आणलीं आहेत. तसेंच जनार्दनपंत भानू यांची स्त्री व मुलगा ( प्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडनवीस ) हीं काशीस जाण्यासाठीं आलीं आहेत. शत्रु तर महापराक्रमी; तेव्हां मल्हाररावांच्या सल्ल्याप्रमाणें मागेंच रहाणें योग्य ! ' परंतु मेहेंदळे वगैरे मंडळींनीं या सल्ल्याची चेष्टाच केली व भाऊसाहेब पुढें कूच करीत निघाले.

---

भाऊसाहेब निघाले ते कोणाचीही पर्वा न करतां थेट जेथें मल्हारराव व जनकोजी शिंद्यांची छावणी होती तेथें येऊन पोंचले. एवढें कळकळीनें विनविलें असतांही भाऊसाहेब येथवर येऊन पोंचलेले पाहून मल्हाररावांस अत्यंत राग आला व ते त्या भरांत भाऊसाहेबांस कांहीं अपशब्दही बोलले.

मुलांनों, मल्हारराव 'अपशब्द बोलले' एवढ्यावरून मात्र तुम्ही त्यांच्याविषयीं वाईट ग्रह करून घेऊं नका. कारण मल्हाररावांनीं सर्व जन्म रणांगणांत वेंचला होता; अर्थात् ते लढण्याच्या कामीं अनुभवी होते. तेव्हां भाऊसाहेबांसारख्या अननुभवी माणसानें आपलें न ऐकतां जीव धोक्यांत घातल्यास मल्हाररावांस राग येणें अगदीं साहाजिक होतें असें तुम्हांसहि वाटल्यावांचून राहाणार नाहीं. असो.

झाल्या गोष्टीस इलाज नव्हता. तेव्हां प्रथम बरोबर आलेल्या बायकामुलांची व्यवस्था लावणें अवश्य होतें. तेव्हां सर्वानुमतें आग्र्याचा किल्ला मुक्रर करण्यांत आला.

नंतर मराठ्यांनीं हल्ला करून दिल्ली शहर व तेथील

किल्ला सर केला. या स्वारींत खर्च भयंकर आल्यानें बादशाही तक्तावर चांदीचें छत होतें तें गाळून त्याचीं नाणीं पाडून फौजेस रोजमुरा वांटण्यांत आला.

पुढें भाऊसाहेबांनीं शिंदेहोळकरांस विचारलें कीं, 'यमुनेस पाणी फार असल्यानें गिलच्यांवर सध्यां हल्ला करतां येत नाहीं. तरी सध्यां कुतुबशहा व महंमदखान यांचें पारिपत्य करावें असा विचार आहे.' यावर मल्हाररावांनीं आपलें स्पष्ट मत दिलें कीं, 'आपण जर गनिमी काव्यानें न लढतां एकदम युद्ध करण्याच्या भानगडींत पडलों तर आपणास यश येईलच असें सांगवत नाहीं.' परंतु भाऊसाहेबांनीं मल्हाररावांचा अपमान करण्याचा जणूं विडाच उचलला होता. ते म्हणाले, 'आम्ही दक्षिण सोडून येथवर आलों ते कांहीं तुमच्या बळावर आलों नाहीं. आमचे आम्ही खंबीर आहों. आम्हांस वाटेल तसें आम्ही करूं! तुम्हांस रहावेल तर तुम्ही रहावें, नाहींतर परत जावें!' हें भाषण ऐकून मल्हाररावांस मरणप्राय दुःख झालें. परंतु तें त्यांनीं वेळेकडे लक्ष देऊन सहन केलें.

अखेर भाऊसाहेबांनीं पूर्वसंकेताप्रमाणें कुतुबशहा व महंमदखान यांचेवर हल्ला केला. मराठ्यांचा हा हल्ला जबर होता. तो शत्रूस सहन न झाल्यानें त्यांनीं पळ काढण्यास सुर-

वात केली. तेव्हां एका बाजूनें पेंढारी व दुसरीकडून घोडेस्वार अशा कैचींत शत्रु सांपडला व त्यास 'दे माय धरणी ठाय' असें होऊन गेलें. या प्रसंगीं मराठ्यांस मुबलक लूट सांपडली.

कुतुबशहा व महंमदखान यांचा पाडाव होऊन ते जिवंत शत्रूच्या हातीं लागले. कुतुबशहानें दत्ताजी शिंद्यांचा निर्दयपणें शिरच्छेद केला हे भाऊसाहेबांस स्मरतांच त्यांच्या अंगाची आग झाली व त्याचा शिरच्छेद करण्याचा त्यांनीं हुकूम दिला. तेव्हां-कुतुबशहा लाचार होऊन बोलला कीं, 'मला वाचवाल तर तुमचा व गिलच्यांचा सल्ला करून देईन.' हें ऐकतांच मल्हारराव भाऊसाहेबांस म्हणाले कीं, 'यास मारून दत्ताजी कांहीं परत येत नाहींत; मग यास जीवदान देऊन एक महत्कार्य साधून घ्यावें!' परंतु भाऊसाहेबांनीं कोणाच्याच बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं व कुतुबशहा व महंमदखान यांचा शिरच्छेद करविला.

अशातऱ्हेनें भाऊसाहेबांस विजयश्रीनें माळ घातल्यामुळें ते फारच फुशारले. ते उघड उघड म्हणूं लागले कीं, 'मल्हारराव उगीच आम्हांस गिलच्यांची भीति दाखवित होते. सुभेदारांच्या अंगांत एवढें कांपरें भरण्याची जरूर नव्हती.' मल्हाररावांचे वय व अनुभव विशेष असल्यानें वास्तवीक भाऊसाहेबांनीं त्यांचा सल्ला ऐकावयाचा. तें न करतां उलट त्यांच्या

अंगी भित्रेपणाचा आरोप केल्यानें त्यांस भयंकर त्वेष आला. मल्हारराव प्रथमपासूनच स्पष्टवक्ते होते. ते रागावून म्हणाले, 'भाऊसाहेब, दिल्ली तो बहुत दूर है ! एवढा जय मिळाला म्हणून आपले हात स्वर्गास पोंचले असें समजूं नका !' पण म्हणतातना कीं, 'आधीं बुद्धि जाते व मग भांडवल जातें' तशीच गत सध्यां भाऊसाहेबांची झाली होती; नाहींतर मल्हार-रावांसारख्या वीराचा ते अशा शब्दांनीं अपमान करतेना ! 'होणारें न चुकेल, होईल जरी ब्रह्मा तया आडवा' दुसरें काय ! कुतुबशहा व महंमदखान यांचा अमानुषपणें वध केल्याची बातमी जेव्हां नजीबखान व अहंमदशहा अब्दल्ली यांस कळली तेव्हां ते तावातावानेंच मराठ्यांवर चाल करून आले. हें अकस्मात् विघ्न आल्यानें भाऊसाहेब गोंधळून गेले. त्यांनीं मल्हाररावांचा सल्ला विचारला. मल्हाररावांचा पाणउतारा ताजाच असल्यानें ते एकदम म्हणाले, 'आम्ही काय भित्रे व म्हातारे ! आतां दरवेळेस आपणांस सल्ला देणारे बळवंतराव मेहेंदळे यांसच युक्ति विचारावी !' पुढें इतर मंडळींच्या मतें प्रथम मल्हाररावांनीं सुचविल्याप्रमाणें त्वरेनें दिल्लीस जाणेंच योग्य असें ठरलें. तेव्हां थोडें सैन्य पुढें शत्रूच्या पाळतीवर रवाना करून इतरांनीं दिल्लीच्या रोखानें कूच केलें. परंतु ते जरा पुढें जातात तोंच पुढें पाठविलेलें सैन्य माघारें येतांना दिसलें.

गिलचे सपासप मराठ्यांच्या फौजेचा शिरच्छेद करीत येत होते. हें पाहून तर भाऊसाहेबांची कंबरच खचली. अखेर मल्हाररावांच्या मतें पानिपत येथेंच छावणी करण्याचें ठरलें. गिलचे जरी एवढ्या तयारीनें येत होते तरी त्यांस भाऊसाहेबांचा दरारा वाटत होता. त्यामुळें मराठ्यांवर एकदम चालून येण्याची त्यांची हिंमत होईना. तेव्हां त्यांनीं मराठ्यांस अन्नसामुग्रीचा पुरवठा होणार नाहीं अशी व्यवस्था केली. यामुळें तर मराठे अगदीं जेरीस आले. पोटांत अन्न नाहीं व खजिन्यांत पैसा नाहीं अशा प्रसंगांत भाऊसाहेब सांपडले. तेव्हां त्यांनीं लष्करांत जेवढे सोन्यारुप्याचे जिन्नस होते त्यांचे रुपये पाडण्याचा हुकूम दिला. परंतु धान्य कोठून आणणार ? जवळ पैसा असून पोटास अन्न मिळेना.

अर्थात् जो तो दुसऱ्यास दूषण देऊं लागला. बळवंतराव मेहेंदळे म्हणाले कीं ‘शिंदेहोळकर मोठे शूर म्हणवितात, मग आतांच कां त्यांची नांगी नरम पडली ? कीं त्यांच्या मर्जीविरुद्ध आम्हीं वागलों म्हणून ते आतां कुचराई करतात ?’ हें बोलणें जनकोजींस भयंकर झोंबलें. ते म्हणाले ‘बळवंतराव आम्ही कुचराई करतों ! परंतु आपण भाऊसाहेबांस खोटा सल्ला देण्यापलीकडे कोणता दिग्विजय केला आहे ? आमचा शूरपणा

पहावयांचा असेल तर हेच आम्ही युद्धास निघालों.' असें तावातावानें बोलून ते आपल्या गोटांत आले. भाऊसाहेबांनीं त्यांस दोन समजुतीच्या गोष्टी सांगितल्या पण ते ऐकेनात.

दुसऱ्या दिवशींच प्रातःकाळीं जनकोजी गिलच्याशीं टक्कर देण्याकरतां बाहेर पडले व त्यांनीं मल्हाररावांस फौजेनिशीं येण्याची सूचना केली. मल्हाररावांस हें ऐकून 'इकडे आड व तिकडे विहीर' असें झालें. जनकोजीच्या मदतीस जावें तर भाऊसाहेबांचा अपमान होतो, व न जावें तर शिंद्यांच्या राहिलेल्या वंशवृक्षाची हेळसांड केल्यासारखें होतें. तेव्हां त्यांनीं शिंद्यांच्या मदतीस थोडीशी फौज पाठवून दिली. जनकोजी लढाईस निघाले हें ऐकून भाऊसाहेबांनीं बळवंतराव मेहेंदळ्यास दोष दिला, व त्यानीं त्यांस फौजेनिशीं जनकोजींच्या मदतीस दवडलें.

जनकोजी मारीन किंवा मरेन याच ईर्ष्येनें बाहेर पडले होते. त्यामुळें त्यांची व गिलच्यांची गांठ पडतांच भयंकर युद्ध सुरू झालें. जनकोजीची तलवार सपासप शत्रु कापीत जात होती. त्यामुळें शत्रूनें कच खाल्ली. हें जनकोजीच्या लक्षांत येतांच त्यानीं निकराचा हल्ला चढविला; व मेंढरें झोडपावींत तसें शत्रूस झोडपीत त्यांस माघार घेण्यास त्यानीं भाग पाडलें.

बळवंतराव मेहेंदळे मात्र मदतीस आले असतांही एका बाजूस राहिले होते. उद्देश एवढाच कीं जर जनकोजीनें कच खाल्ली तर आपण पुढें होऊन विजयश्री मिळवावी. परंतु विधिघटना निराळीच असल्यानें जनकोजीस विजयश्रीनें माळ घातली. वास्तवीक बळवंतराव जर पुढें मदतीस जाते तर गिलच्यांचा त्या दिवशीं पूर्ण पराभव झाला असता. परंतु त्यांस शिंदेहोळकरांचें नाक खालीं घालावयाचें होतें ना ? असो.

एवढा विजय मिळवून जर शिंदेहोळकर स्वस्थ बसले नसते, तर त्याच जोरांत त्यांनीं शत्रूचा पूर्ण बींमोड केला असता. परंतु होणारें कसें टळणार ? एके दिवशीं शत्रूनें आपल्या वकिलाबरोबर गोविंदपंत बुंदेले यांचे शीर व एक पत्र भाऊसाहेबांस पाठविलें व त्यांत लिहिलें कीं, 'तुमचे गोविंदपंत तुम्हांस स्वर्गांत जागा पहाण्यासाठीं गेले आहेत व तुम्हांस बोलाविण्यास हें शीर आलें आहे.' त्यास उलट भाऊसाहेबांनीं उत्तर पाठविलें कीं 'ती जागा सर्वांचींच आहे. आपणां खाविंदांची बरदास्त रहावी म्हणून व्यवस्था करण्यासाठीं आमचे गोविंदपंत पुढें गेले आहेत.' त्या दिवशीं बळवंतराव जर जनकोजीस मदत करते तर हा अपमान सहन करण्याची वेळ आली नसती असेंच प्रत्येकास वाटूं लागलें; व जिकडे तिकडे

तोच चर्चेचा विषय झाला. तेव्हां बळवंतरावांस लढाईवर निघण्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. ते तसेच भाऊसाहेबांकडे परवानगी मागण्यासाठीं गेले. प्रथम भाऊसाहेबांनीं बरेच आढे-वेढे घेतले. परंतु बळवंतरावांचा निश्चयच दिसल्यानें त्यांनीं त्यांस परवानगी दिली व सर्वांनीं बळवंतरावांस मदत करावी अशी सैन्यांत दवंडी पिटविली. त्याप्रमाणें फक्त शिंदे व होळकर पुढें सरसावले.

शत्रु या खेपेस फारच तयारीनें आला होता. त्यामुळें बळवंतरावांच्या फौजेस पुढें पायच टाकतां येईना. शत्रूनें एक-सारखा तोफांचा भडिमार सुरू केला. त्यांतच एक गोळी बळवंतरावांस लागून ते धरणीवर पडले. हें पहातांच एक गिलचा त्यांच्या उरावर पाय देऊन त्यांचे शीर कापूं लागला. हें पाहून खंडेराव नाईक निंबाळकर हे बळवंतरावांच्या प्रेतावर जाऊन पडले व अंगावर पुष्कळ वार झाले असतांही त्यांनीं बळवंतरावांचें शीर कापूं दिलें नाहीं. हाच मराठ्यांचा स्वाभिमान! पुढें बळवंतरावांचें प्रेत गोटांत आणल्यावर भाऊसाहेबांस भड-भडून आलें. बळवंतरावांच्या बायकोनें तर सती जाण्याचा निश्चय केला. भाऊसाहेबांचा नाइलाज होऊन त्यांनीं तिला परवानगी दिली. याप्रमाणें बळवंतराव मेहेंदळ्यांची समाप्ति झाली.

बळवंतराव मेहेंदळे पडल्यानंतर मराठ्यांनीं आणखी कच खाल्ली. पोटांत अन्न नाहीं व शत्रूचा पाडाव करण्याची सोय नाहीं अशा दुहेरी पेंचांत ते सांपडले. फौजेंतील सर्व लोक म्हणूं लागले कीं, 'सरकार आम्हांस युद्धांत मारा, पण भुकेनें प्राण कासावीस होतात ते सहन होत नाहींत!' तेव्हां तेथून तळ हलविल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. परंतु दिल्लीस जावें तर मध्यें शत्रूचा तळ होता. तेव्हां इब्राहिम गारद्यास विचार पुसला. त्यानें सैन्याचा व्यूह रचून जपून पुढें जाण्याचा सल्ला दिला.

तळ सोडून पुढें गेल्यावर दुर्दैवानें भाऊसाहेबांचा विचार फिरला व त्यांनीं असा हुकूम दिला कीं, शत्रूनें निमुटपणें वाट दिल्यास ठीक नाहींतर बेलाशक शत्रूशीं दोन हात करून पुढें जावें. झालें. वेळ फिरली व पानिपतचा घनघोर रणसंग्राम सुरू झाला. खुद्द भाऊसाहेब व पेशव्यांचे ज्येष्ठ पुत्र विश्वासराव फौजेस उत्तेजन देत होते. परंतु इतक्यांत एक गोळी जी 'सूं सूं' करीत आली ती विश्वासरावांच्या काळजांतच घुसली व ते तत्काळ गतप्राण झाले. याप्रमाणें पेशवे वंशांतील एक हिरा हरपला.

इकडे भाऊसाहेबांस ही बातमी कळतांच त्यांचें हातपायच मोडले. परंतु ही वेळ शोक करीत बसण्याची नव्हती. उलट त्यांनीं सूड घेणेंच भाग होतें. तव्हां त्यांनीं हातांत तलवार घेऊन क्षणभर शौर्याची कमाल केली. परंतु मराठ्यांच्या पदरीं कांहीं गिलचेही नोकरीस होते. त्यांनीं ही वेळ साधून मराठ्यांसच लुटण्यास सुरवात केली. तव्हां आपला पराभव होऊन गिलचे आपणांस लुटीत आहेत असा सर्व फौजेचा समज होऊन ते रणांगणांतून पळूं लागले. युद्धास तोंड लागण्यापूर्वी भाऊसाहेबांनीं मल्हाररावांस असें सांगितलें होतें कीं ‘ दुर्धर प्रसंग आल्यास तुम्ही आमचें कुटुंब, आणि नाना फडनाविसांची मातुश्री व कुटुंब यांस प्रथम देशीं घेऊन जावें. ते नच साधल्यास आपल्या हातानें आमच्या कुटुंबाचा शिरच्छेद करावा, परंतु शत्रूच्या हातीं पडूं देऊं नये ! ’

असो. वर सांगितल्याप्रमाणें फौजेची अवस्था पाहून भाऊसाहेबांनीं मल्हाररावांस पूर्वी ठरल्याप्रमाणें निर्वाणीचा प्रसंग गुदरला आहे असा निरोप पाठविला व स्वतः रणकुंडांत उडी घेतली. एकदोन क्षणांत ते दिसेनासे झाले. पुढेंहि त्यांचा मुळींच पत्ता लागला नाहीं. या प्रमाणें हा दुसरा हिराही अनपेक्षित रीतीनें हरपला. भाऊसाहेबांचें शेजारीं जनकोजी शिंदे होते. त्यांचीही भाऊसाहेबां-

प्रमाणेंच स्थिति झाली.

भाऊसाहेब व जनकोजी गेले ही बातमी फौजेंत पसरतांच राहिलेली फौजही सैरावरा पळूं लागली. या पळापळींत गिलच्यांनी मराठ्यांची न भूतो न भविष्यती अशी कत्तल केली.

इकडे मल्हाररावांस भाऊसाहेबांचा अखेरचा निरोप पोंचल्यावर ते जेथें बायकामुलें होतीं तेथें गेले; परंतु ते जाण्यापूर्वींच बायकामुलें पळून गेलीं होतीं. फौज तर आधींच पळून गेली होती. अशा स्थितींत एकट्या हातानें शत्रूस थोपवून धरणें शक्य नव्हतें. तेव्हां मल्हाररावांनीं मुकाट्यानें दिल्लीच्या मार्गानें कूच केलें. अशा तऱ्हेनें पानिपत येथील हत्याकांड संपलें.

पानिपतचें रण सोडून मल्हारराव जे निघाले ते त्यांस वाटेंत भाऊसाहेबांच्या पत्नी पार्वतीबाई, नाना पुरंदरे वगैरे मंडळी भेटली; त्यांस बरोबर घेऊन ते ग्वाल्हेरीस येऊन पोंचले.

पानिपतच्या हत्याकांडांतून कांहीं लोक बचावून आले त्यांत विठ्ठल शिवदेव विंचूरकरही होते. त्यांची व नानासाहेब पेशव्यांची जेव्हां गांठ पडली तेव्हां दोघांच्याही डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू झाला. प्रत्येक क्षणीं जी जी मंडळी भेटत त्यांस नानासाहेब पानिपतचीच हकीगत विचारीत. एके दिवशीं अशीच गोष्ट निघाली असतां पेशव्यांनीं विंचूरकरांस विचारलें

कीं, 'मल्हाररावांविषयीं अनेक लोक अनेक बातम्या सांगतात, तरी खरी गोष्ट काय होती हें समजून घेण्याची माझी इच्छा आहे.' तेव्हां विंचूरकर म्हणाले कीं, 'सरकारांस कोणी कांहींही सांगो; परंतु मल्हाररावांनीं स्वामिसेवेंत कधींही कुचराई केली नाहीं. उलट भाऊसाहेबांस मात्र त्यांनीं वडीलकीच्या नात्यानें वारंवार हिताच्या गोष्टी सांगितल्या, परंतु भाऊसाहेबांनीं त्यांचें एकाही वेळीं ऐकलें नाहीं.' पानिपतचा पराभव, भाऊसाहेबांचा व विश्वासरावांचा मृत्यु वगैरे गोष्टीमुळें नानासाहेबांनीं हाय खाल्ली व थोड्याच दिवसांत त्यांचें देहावसान झालें. यानंतर नानासाहेबांचे चिरंजीव माधवराव यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं.

पानिपतांत मराठ्यांचा पराभव झाल्यानें मराठी राज्य सर्वस्व नष्ट करण्यास हीच वेळ चांगली आहे असें मराठ्यांचा अखंड शत्रु हैद्राबादकर निजाम यानें ताडलें व त्यानें प्रथम पुण्यावर स्वारी केली. निजामाची स्वारी इतक्या लौकर होईल अशी मराठ्यांस कल्पनाही नव्हती. तो आल्याची बातमी समजतांच दादासाहेबांनीं मल्हारराव होळकर व दमाजी गायकवाड यांस घेऊन माधवरावसाहेबांसह पुण्याहून कूच केलें. निजामानें पुण्याची बरीच नासाडी केली व तेथें त्यास बरेंच द्रव्यही मिळालें. निजाम नंतर पुण्याहून औरंगाबादेकडे गेला.

पुण्याची नासाडी करून निजाम औरंगाबादेकडे गेला ही बातमी दादासाहेबांस समजतांच त्यांनीं माधवरावसाहेबांस मागें ठेऊन मल्हारराव होळकरांसह त्याच्यावर चाल केली. परंतु मराठ्यांची फौज पडली थोडी. त्यामुळें दादासाहेब शत्रूंच्या हातीं सांपडले एवढ्या गडबडींत जरीपटक्याचा हत्ती उधळला व जरीपटका सोंडेंत धरून पळतच श्रीमंत माधवरावसाहेबांच्या तंबूपाशीं येऊन तो थांबला. हत्तीस पहातांच आपला पराजय झाला हें माधवराव समजले. परंतु ते शूराचे बच्चे असल्यानें डगमगले नाहींत. त्यांनीं आपल्या तैनातींत असलेल्या फौजेस असा सवाल केला कीं, 'मला तुम्ही लहान समजतां ? मी जरी लहान असलों तरी आपली सर्वांची मला मदत असल्यावर शत्रूचा तो दम काय ? शूर असाल तर उचला तलवारी !' हे शब्द ऐकतांच पंधराशें स्वार भरधांव सुटले.

वाटेंत त्यांस मल्हारराव परत येतानां दिसले. जेथें आपला व दादासाहेबांचा टिकाव लागला नाहीं तेथें हें मूल जाऊन काय करणार असें सहाजिकच मल्हाररावांस वाटलें. तेव्हां ते माधवरावसाहेबांस म्हणाले, 'सरकार, परत फिरा; आपण पुण्याचें राज्य करूं !' पण तो चवताळलेला सिंह; त्यास ही मसलत कशी रुचावी. उलट त्यास रागच आला.

ते म्हणाले, 'काका, पानिपतावर आपण भाऊसाहेबांस बुडविलें असा लोकापवाद होता; परंतु तो आज खरोखरीच प्रत्ययास आला!' ज्यांनीं आपलें सर्व आयुष्य स्वराज्याकरितां वेंचलें त्या मल्हाररावांस हें बोलणें कसें सहन व्हावें? पानिपतचा आपणास विनाकारण लागलेला डाग धुऊन काढण्याची हीच वेळ होय असें त्यांनीं ताडलें. ते म्हणाले, 'असें आहे! तर चलावें सरकार! माझ्याही तलवारीची चुणुक पहावी.'

हे दोघे व्याघ्रसिंह त्वेषानें निजामावर चाल करून गेल्यानें निजामाचे लोक पळूं लागले. हें पाहतांच निजाम एकदम शरण आला. याप्रमाणें यश संपादन करून पेशवे व मल्हारराव पुण्यास परत आले.

इकडे अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला व इंग्रज यांची लढाई जुंपली. तेव्हां सुजाउद्दौलानें मल्हाररावांस बरेचसे पैसे देण्याचें कबूल करून मदत करण्याची विनंति केली. त्याप्रमाणें पेशव्यांची परवानगी घेऊन मल्हारराव या कामगिरीवर गेले. प्रथम त्यांनीं इंग्रजांवर जो हल्ला केला त्यांत त्यांनीं त्यांच्या सात पलटणी ठार मारल्या; व चौदाशें गोरेलोकांचा पाडाव करून त्यांच्या डोक्यावर बंदुकीच्या मोळ्या देऊन त्यांस आपल्या छावणींत आणलें.

इकडे इंग्रजांनीं राहिलेल्या फौजेनिशीं रातोरात मल्हार-रावांच्या फौजेवर छापा घातला. फौज बेसावध असल्यानें प्रतिकार न करतां पळूं लागली व तिच्या मागें इंग्रज लागले. पळत पळत मराठी फौज यमुनेच्या कांठीं आली. परंतु नदीस पाणी फार असल्यानें ओलांडून जाणें शक्य नव्हतें. तेव्हां मल्हाररावांनीं यमुनेची प्रार्थना करून व श्रीमार्तंडाचें नांव घेऊन हत्ती पाण्यांत सोडला. तों त्यास कमरेइतकें पाणी लागून तमाम मराठी फौज पैलतीरीं गेली. पाठोपाठ इंग्रजही येऊन पोंचले. परंतु ते पाण्यांत उतरतांच बुडून मरूं लागले. तेव्हां नाइलाज होऊन त्यांस परतणें भाग पडलें. आपल्या पूर्वींच मल्हारराव सर्व फौजेनिशीं पैलतीरीं गेले असें मुख्य साहेबास समजलें तेव्हां त्यास फार आश्चर्य वाटलें. सहजच त्याच्या तोंडून उद्गार निघाले कीं, 'मल्हार कांहीं मनुष्य नव्हे, कांहीं तरी ईश्वराचा अंश त्यांत असला पाहिजे.' असें बोलून त्या साहेबानें मल्हारराव ज्या वाटेनें गेले होते त्या वाटेकडे तोंड करून टोपी काढली व त्यांस सलाम करून नंतरच त्यानें फौजेस कूच करण्याचा हुकूम दिला. मल्हाररावांची झालेली दैना जेव्हां दादासाहेबांस कळली तेव्हां ते त्यांच्या मदतीस सरसावून निघाले. राणोजी शिंद्यांचे तीन पुत्र व एक नातु जनकोजी हे पेशव्यांच्या सेवेंतच बळी पडल्यामुळें

त्यांचा लौकिक पुढें चालावा म्हणून दादासाहेबांनीं राणोजीचा पुत्र महादजी शिंदे यास बरोबर घेतलें.

दादासाहेब कूच करीत आले ते थेट ग्वाल्हेरनजीक आले. तेव्हां तेथें त्यांस मल्हारराव भेटले. त्यावेळीं मल्हाररावांनीं दादासाहेबांनां सांगितलें कीं गोहद्च्या जाटानें मराठी राज्यांतील बराच मुलुख आपल्या राज्यांत सामील केला आहे. तेव्हां जाटाची वाट लावणें अवश्य आहे. परंतु दुर्दैवानें महादजी जाटास फितुर झाले. ही बातमी दादासाहेबांस समजतांच 'महादजीस एकदम शिरच्छेद करून मारावा' असा त्यांनीं हुकूम दिला ! परंतु मल्हाररावांनीं रदबदली करण्याचा बराच प्रयत्न केला. ते म्हणाले, 'दादासाहेब, शिंदे घराण्यांतील चार जवान आपल्या सेवेंत पडले आहेत. अर्थात् अशा घराण्यास क्षुल्लक कारणावरून दुखविणें बरोबर नाहीं.' परंतु दादासाहेब कांहीं केल्या ऐकेनात ! ते म्हणाले 'सुभेदार, आपण या कामांत पडूं नका. गुलाम अखेर आपल्या जातीवर गेला !'

मल्हाररावांस महादजी शिंद्याचा बचाव करणें अवश्य होतें. तेव्हां महादजीस बरोबर घेऊन मल्हारराव दुसरे दिवशीं दादासाहेबांच्या डेऱ्यास गेले. त्या दोघांनीं हात बांधून दादासाहेबांच्या पायांवर लोटांगण घातलें. हें पाहून दादासाहेबांस गहिंवरून आलें. ते

म्हणाले 'सुभेदार, आपण पुत्रवत् प्रेम करून या योग्यतेस आपणच मला आणलेंत. परंतु ज्याअर्थी आपण हात बांधून मला दंडवत घातलें त्याअर्थी आमचें नष्टचर्य जवळ आलें असें दिसतें!' तेव्हां सुभेदार म्हणाले 'सरकार, हा देह आपल्याच अन्नावर पोसला आहे व आपणच त्याचे धनी आहांत. आपणांखेरीज आम्हांस दुसरें कोण आहे? परंतु या पोराच्या (महादजीकडे बोट करून) अन्नूस बट्टा न लावतां त्याचेकडून सेवा करून घ्यावी. आतां आमची स्वतःची श्रम करण्याची ताकद उरली नाहीं. आमच्या डोळ्यादेखत बाळाजीपंत, बाजीरावसाहेब व नानासाहेब हीं तीन पुरुषरत्नें गेलीं! आम्हीही आतां फार दिवस वांचतों असें नाहीं.' याप्रमाणें बोलून मल्हाररावांनीं डोळ्यास पाणी आणलें. तेव्हां दादासाहेबांसही गहिंवरून आलें. अशा तऱ्हेनें महादजी शिंद्यांचा बचाव झाला.

वरील हकीगत घडली त्यानंतर थोड्याच दिवसांनीं मल्हाररावांच्या कानास ठणका लागून त्यांची प्रकृती बिघडली. आपली अंतकाळची वेळ जवळ आली हें मल्हार-रावांनीं तावडतोब ओळखलें. तेव्हां त्यानीं दादासाहेब, महादजी शिंदे, तुकोजी होळकर वगैरे मंडळीस बोलावून म्हटलें कीं, 'दादासाहेब, मीं तर चाललों; परंतु यावेळीं माझा खंडू असता

तर किती बरें झालें असतें ! असो; परमेश्वराची इच्छा. आतां हा माल्ह ( मालेराव ) हा खंडूच समजून आपल्या पदरांत घालतों. पोर असून लहान आहे तेव्हां जरा त्यास संभाळून घ्या.' असें म्हणून त्यांनीं मालेरावाचा हात दादासाहेबांच्या हातांत दिला; व आपण वैशाख वद्य एकादशीस म्हणजे ता. २० माहे मे १७६६ रोजीं परलोकीं गमन केलें. दादासाहेबांनीं हें पाहून तर एकदम बैठकच मारली. ते हंबरडा फोडून म्हणूं लागले कीं, ' आज माझा पाठीराखा गेला. आज माझा सर्व आधार तुटला.' साध्वी अहिल्याबाई व त्यांचे चिरंजीव मालेराव हे तर गुराप्रमाणें हंबरडा फोडीत होते. खंडेराव होळकर मृत्यु पावल्यापासून आज बारातेरा वर्षें अहिल्याबाई आपल्या परम-विख्यात, शूर व प्रत्यक्ष पित्याप्रमाणें प्रेम करणाऱ्या श्वशुराच्या कृपाछत्रांत सुखानें परमेश्वरभजनांत कालक्रमणा करीत होत्या. तेंच छत्र ढासळलें. असो. याप्रमाणें मल्हारराव होळकरांचे चरित्र संपलें.

मुलांनों, सुभेदार मल्हारराव होळकर हे अत्यंत लहान दर्जापासून स्वतःच्या कर्तबगारीच्या जोरावर मोठ्या योग्यतेस कसे चढले तें तुम्ही पाहिलेंच. ते अतिशय शूर तर होतेच परंतु पराकाष्ठेचे स्वामिभक्त होते. बाळाजी विश्वनाथ, पहिले बाजीराव, बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब आणि माधवराव या चार पेशव्यांच्या कारकीर्दींत त्यांची सेवा मराठी राज्याच्या उपयोगीं पडली. मराठी राज्याची पराकाष्ठेची वाढ मल्हाररावांच्या हयातींतच झाली. अटकेस झेंडा लावण्याच्या कामगिरींत त्यांचा हात होता हें तुम्ही वाचलेंच.

मरणसमयीं मल्हाररावांचें वय ७३ वर्षांचें होतें. वृद्धावस्थेंतील त्यांच्या शौर्यापेक्षां त्यांचा अनुभव मराठी राज्याच्या पुष्कळ कामास आला. माधवराव पेशव्यांनीं अत्यंत चातुर्यानें राज्यकारभार चालवून पानिपतच्या युद्धांत नाश पावलेलें मराठ्यांचें वैभव पूर्वस्थितीस आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. या त्यांच्या प्रयत्नास सुभेदार मल्हारराव होळकरांच्या अनुभवाची जोड मिळती तर त्यांस अपूर्व जय मिळाला असता.

विशेषतः इंग्रजांचा दिल्लींत प्रवेश होऊन ते दिवसेंदिवस डोईजड होण्यास मल्हाररावांचें अकालीं मरणच कारण झालें असें म्हटल्यास हरकत नाहीं.

श्री शिवाजी महाराजांनीं जी हिंदुपदवादशाहीची स्थापना केली व जिची पुढें शेंसवाशें वर्षें उत्तरोत्तर वाढ होत गेली त्या बादशाहीचें अवशिष्ट अशी जीं कित्येक देशी संस्थानें म्हणून आजमितीस आपण आपल्या भरतभूमींत पहातों त्यांतील इंदूर संस्थान हें एक प्रमुख संस्थान असून सुभेदार मल्हारराव होळकर हे त्या संस्थानाचे मूळपुरुष होत. श्रीमंत महाराजाधिराज राजराजेश्वर सवाई श्री यशवंतराव महाराज होळकर हे इंदूर संस्थानचे सध्यांचे अधिपति आहेत हें तुम्हांस सांगावयास नकोच.

मराठी ग्रंथ संग्रहालय
५६५

REFBK-0005965

# श्रीसयाजी बालज्ञानमाला

## ऐतिहासिक चरित्रें

| | | |
|---|---|---|
| १ (४) | **महाराणा प्रताप.** रमणलाल वसंतलाल देसाई, एम्. ए. (१९१९–१९२२) | ०–६–० |
| २ (८) | **औरंगजेब.** मनसुखराम मोहनलाल पोटा, बी. ए. (१९१९–१९२२) | ०–६–० |
| ३ (१०) | **रणजितसिंह.** भरतराम भानुसुखराम महेता, ओ. टी. सी. ई. (१९२०–१९२३) | ०–६–० |
| ४ (११) | **श्रीहर्ष.** भरतराम भानुसुखराम महेता (१९२०–१९२२) | ०–६–० |
| ५ (१६) | **बाल नेपोलियन.** दिनकरराय पुरुषोत्तमराय जोषीपुरा (१९१९-१९२५) | ०–६–० |
| ६ (१९) | **श्रीहर्ष.** आनंदप्रिय आत्मारामजी, बी. ए., एल्एल्. बी. [हिंदी] (१९२१) | ०–८–० |
| ७ (२४) | **लॉर्ड विलियम बेन्टिक.** हीरालाल हरजीवन गणात्रा, बी.ए,,एल्एल्.बी, सॉलिसिटर (१९२२) | ०–६–० |

८ (२५) **नाना फडनवीस**. रमणलाल वसंतलाल देसाई, एम. ए. (१९२२) ०—६—०

९ (२८) **महादजी सिंधिया**. वल्लभराय लालशंकर छाया, बी. ए. (१९२२) ०—६—०

१० (३४) **बाल बाबर**. मनसुखलाल मोहनलाल पोटा, बी. ए. (१९२३) ०—६—०

११ (४१) **विलियम युवर्ट ग्लॅडस्टन**. हीरालाल हरजीवन गणात्रा, बी,ए.,एल्एल्.बी., सॉलिसिटर (१९२४) ०—६—०

१२ (४२) **शूरवीर शिवाजी**. भरतराम भानुसुखराम महेता, ओ. टी. सी. ई. (१९२४) ०—६—०

१३ (४७) **छत्रपति संभाजी महाराज**. केशव मंगेश रांगणेकर, बी. ए. [मराठी] (१९२४) ०—६—०

१४ (४८) **महाराणा प्रताप**. परशुराम गोविंद काटदरे [मराठी] ०—६—०

१५ (५१) **ड्यूक ऑफ् वेलिंग्टन**. हीरालाल हरजीवन गणात्रा, बी.ए.,एल्एल्.बी., सॉलिसिटर (१९२४) ०—६—०

१६ (६४) **औरंगजेब**. आनंदप्रिय आत्माराम पंडित, बी.ए.,एल्एल्.बी. [हिन्दी] (१९२६) ०—८—०

१७ (६६) **चक्रवर्ती अशोक**. हरिराय भगवंतराय बुच ०—६—०

१८ (६७) **बाल बाबर**. विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. [मराठी] ०—६—०

१९ (७७) **विलयम एडवर्ड ग्लेडस्टन**. विष्णु पांडुरंग नेने, बी. ए. [मराठी] (१९२७) ०—६—०

२० (८९) **अशोक**. विष्णु पांडुरंग नेने, बी. ए.
[मराठी] ०—५—०

२१ (९७) **आपणा महाराजा**.—चंद्रशंकर म. भट्ट. ०—६—०

२२ (९८) **कोलम्बस**—(सचित्र) ०—६—०

२३(१०३) **कर्ण**. कवि रामराव मार्तंड भांबुरकर[**मराठी**] ०—६—०

२४(१०५) **रामदास**—कवि रामराव मार्तंड भांबुरकर
[मराठी] ०—६—०

२५(१०७ **झांशीची शूर राणी लक्ष्मीबाई**.
श्रीमती लक्ष्मीबाई प्रधान [**मराठी**](१९३३) ०—६—०

२६(१०९) **भीष्म**. वि. वा. जोशी [**मराठी**] (१९३३) ०—३—०

२७(११४) **एलिचपूर**. य. खु. देशपांडे [**मराठी**]
(१९३४) ०—६—०

२८(११५) **चक्रधर**. दत्तात्रेय सीताराम पंगु, एम्.ए.
राजाराम कॉलेज [**मराठी**] (१९३४) ०—४—०

२९(१२४) **विमळशाह**. धीरजलाल टोकरशी शाह
(१९३५) ०—६—०

३०(१३२) **वस्तुपाळ तेजपाळ**. धीरजलाल टोकरशी
शाह (१९३५) ०—६—०

३१(१३५) **मीराबाई**. सौ. पुष्पा र. वकील, बी. ए.
(१९३५) ०—५—०

३२(१३८) **हेमचंद्राचार्य**. पंडित बेचरदास दोशी
(१९३५) ०—८—०

३३(१४५) **चंद्रहास.** रा. सा. ईश्वरलाल खानसाहेब, बी. ए. (१९३७) ०-६-०

३४(१४८) **महमद बेगडो.** प्रो एम्. एफ्. लोखंडवाला, एम्. ए. (१९३७) ०-६-०

३५(१५५) **सुलतान बहादुरशाह.** प्रो. एम्. एफ्. लोखंडवाला, एम्.ए. (१९३८) ०-६-०

३६(१५६) **आनंदीबाई पेशवे.** चिं. ग. कर्वे, बी. ए. [मराठी] (१९४०) ०-६-०

३७(१६३) **मल्हारराव होळकर.** के. मं. रांगणेकर, बी. ए. [मराठी] (१९४०) ०-६-०